दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनिल पोतदार

• वर्ष १६ वे • अंक ४४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.८ मे २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## आज राज्यात ५४,०२२ नवीन कोरोना रुग्ण, ३७,३८६ रुग्णांना डिस्चार्ज

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रात कोरोनाचा प्रकोप सुरुच आहे. आजही कोरोना रुग्णांचा आकडा ५० हजारांच्या वरच आला आहे. आज राज्यात ५४,०२२ नवीन कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे तर ३७,३८६ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. राज्याचा रिकव्हरी रेट ८५.३६ टक्क्यांवर पोहोचला आहे. काल राज्यात ६२१९४ कोरोनाबाधीत रुग्णांची वाढ झाली होती तर ६३८४२ कोरोना बाधित रुग्ण बरे झाले होते. राज्यात आजपर्यंत एकूण ४२६५३२६ कोरोना बाधितांनी कोरोनावर मात केली आहे. राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८५.३६% एवढे झाले आहे. आज राज्यात आज ८९८ कोरोना बाधित रुग्णांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सध्या राज्यातील मृत्यूदर हा १.४९% एवढा आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या २,८९,३०,५८० प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ४९,९६,७५८ (१७.२७टक्के) नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. सध्या राज्यात ३८,४१,४३१ व्यक्ती होम क्वारंटाईनमध्ये आहेत तर २८,८६० व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत. राज्यात आज रोजी एकूण ६,५४,७८८ अॅक्टिव्ह रुग्ण आहेत.

# सिडकोतर्फे करण्यात आलेली मेट्रोची चाचणी यशस्वी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडकोकडून ०७ मे २०२१ रोजी आगार प्रवेश छन्नमार्गावर आणि तळोजा आगारातील चाचणी मार्गावर मेट्रोची चाचणी घेण्यात येऊन, ही चाचणी यशस्वीरीत्या पार पडली. यावेळी एकूण ८५० मीटर लांबीच्या मार्गावर मेट्रो धावली. सुरक्षिततेच्या कारणास्तव मेट्रोचा वेग कमी ठेवून तो ६५ कि.मी. प्रती तास इतका राखण्यात आला. या प्रसंगी उपस्थितांकडून, शासनाने जारी केलेल्या कोविड-१९ विषयक सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात आले.

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या आणि नवी मुंबईतील नोड परस्परांना अधिक सुलभरीत्या जोडले जावेत या उद्देशाने नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत मार्ग (एलिव्हेटेड कॉरिडॉर) विकसित करण्यात येत आहेत. तळोजा आगार येथील आगार प्रवेश छन्नमार्गावर (प्रोच व्हायडक्ट) मेट्रोची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. सध्याच्या परिस्थितीत कोविड-१९ महासाथीचा प्रादुर्भाव वाढत असूनही नवी मुंबई मेट्रो प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा याकरिता सिडको प्रयत्नशील आहे. सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या बेलापूर ते पेंधर या मार्ग क्र. १ च्या जलद अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र मेट्रो रेल



कॉर्पोरेशनची (महा मेट्रो) नियुक्ती करण्यात आली आहे आणि त्यानुसार महा मेट्रोकडून २३ फेब्रुवारी २०२१ रोजी प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता २० तज्ज्ञ अभियंत्यांच्या गटाची स्थापना करण्यात आली आहे. आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएआरएस) यांचे सुरक्षाविषयक प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर मार्ग क्र. १ वरील स्थानक ७ ते ११ दरम्यान साधारणत: डिसेंबर २०२१ अखेरीस आणि स्थानक १ ते ७ दरम्यान साधारणत: डिसेंबर २०२२ अखेरीस वाणिज्यिक परिचालनास (प्रवासी वाहतुकीस) सुरुवात होणार आहे. सदर मार्ग कार्यान्वित झाल्यानंतर नवी मुंबईकरांना लवकरच पर्यावरणस्नेही आणि आरामदायक प्रवासाचा एक उत्तम पर्याय निर्माण होणार आहे.

नवी मुंबईकरांना सर्वोत्तम पायाभूत सुविधा पुरवून त्यांचे जीवनमान उंचावण्यास सिडकोने नेहमीच प्राधान्य दिले आहे. म्हणून नवी मुंबई मेट्रो प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होऊन नवी मुंबईकरांच्या सेवेत रूजू व्हावा याकरिता सिडको प्रयत्नशील आहे. मार्ग क्र. १ वर मेट्रोची चाचणी यशस्वीरीत्या पार पडल्याने या मार्गावर लवकरच मेट्रो धावू लागेल.

**डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## संक्षिप्त...

### राज्य सरकार तिसऱ्या लाटेसाठीही सज्ज : आरोग्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य सरकार कोरोना विरुद्धच्या लढ्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असून ऑक्सिजन निर्मितीसाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. राज्यात सध्या ३८ ऑक्सिजन प्लांटमधून ५३ मेट्रीक टन ऑक्सिनजची निर्मिती होत आहे. पण सध्या इतका ऑक्सिजन राज्याला पुरत नाहीय. राज्याची १७०० मेट्रीक टन ऑक्सिजनची गरज केंद्र सरकारनं भागवली पाहिजे, अशी मागणी राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केली आहे. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. राजेश टोपे यांनी यावेळी कोरोना विरुद्धच्या उपाययोजना आणि राज्य सरकार करत असलेल्या कामांची सविस्तर माहिती दिली. राज्यात आतापर्यंत २८ लाख लोकांना कोरोना विरोधी लसीचे दोन्ही डोस देण्यात आले आहेत आणि येत्या काळात जास्तीत जास्त वेगानं लीसकरण मोहीम राबविण्यासाठी राज्य सरकार संपूर्णपणे प्रयत्न करत आहे, अशी माहिती टोपे यांनी यावेळी दिली. कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सीन या दोनच लसी सध्या नागरिकांना उपलब्ध होत असल्या तरी यात कोव्हॅक्सीनचा राज्यात तुटवडा निर्माण होत आहे. त्यामुळे कोव्हॅक्सीनच्या पुरवठ्याबाबतही केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९८२०३५५३४६**

## एनडी स्टुडिओ मधील सेटला आग ; मोठ्या प्रमाणात नुकसान

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यात चौक कर्जत मार्गावर चित्रपट बनविण्याचे एन डी स्टुडिओ आहे. या ठिकाणी चित्रपट शूटिंग बनविण्यासाठी मोठमोठे फायबर चे सेट बनवून शूटिंग केली जाते या स्टुडिओच्या बाजूला सुकलेले परिसरात गवत आहे. सध्या उन्हाळ्याच्या झळा सुरू असल्याने वणवा लागल्याच्या घटना घडत असल्याने या ठिकाणी शुक्रवारी सकाळी दुपारी १२ : ३० वाजता बाहेर गवताला आग लावून वणवा पटल्याने ही आग आतमध्ये आल्याने या ठिकाणी चित्रपट निर्मिती साठी उभे केलेले सेटला आग पकडली आगीचा भडका वाढतच गेल्याने त्याच्या समोर असलेल्या गेटने ही आग पकडल्याने परिसरात आगीचे लोट पसरले. त्यामुळे आग विझविण्यासाठी अग्निशामक दलाची वाहने तात्काळ हजर झाली आणि तासाभराच्या पाणी फवारणी नंतर आग आठोक्यात आणली.



खालापूर तालुक्यात चौक परिसरात कर्जत मार्गावर चित्रपट सृष्टी निर्मिती साठी एन डी स्टुडिओ आहे. या ठिकाणी मोठं मोठ्या चित्रपट व सीरिअल ची शूटिंग केली जाते. त्यासाठी जवळपास २५ एकर मध्ये वेगवेगळे सेट उभे केले आहेत. या ठिकाणी शूटिंगच्या दरम्यान मोठमोठे अभिनेत्यांची नेहमीच वर्दळ असते. त्यामुळे नेहमीच शूटिंग सुरू असतात. मात्र सध्या कोरोना मुळे येथील कामकाज बंद असल्याने इतर सफाईची कामे ही कामगारामुळे मंदावली असल्याने आजू बाजूला गवत वाढून सुकल्याने सध्या उन्हाळ्याच्या कडक झळा जाणवतात. यामुळे वणवा लागण्याच्या घटना सर्वत्र घडत घडल्याने या ठिकाणी वणवा लागून आग लागल्याने ही आग वाढत जाऊन स्टुडिओ मध्ये गेल्याने याठिकाणी जोधा अगबर या चित्रपटाचे शूटिंग साठी सेटला आग लागली. आगीचा भडका वाढतच असताना समोरील बनविलेला गेट ही पेटला आहे. त्यामुळे सर्वत्र धुराचे लोट पसरले असून ही आग विझविण्यासाठी अग्निशामक दलाच्या वाहनांना पाचारण करण्यात आल्याने ..../२

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते 'एकायन हॉस्पिटल कोविड सेंटर'चे उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना विषाणूच्या प्रभाव सर्वत्र वाढत आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेवर मोठ्या प्रमाणात ताण पडत आहे. त्यापार्श्वभुमीवर वहाळ येथे डॉ राहुल वंजारी, दिपाली गोडघाटे यांनी 'एकायन हॉस्पीटल कोविड सेंटर सुरु केले आहे. या सेंटरचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज (शुक्रवार, दि. ०७) उद्घाटन करण्यात आले.

कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता पनवेल तालुक्यातील वहाळ येथे डॉ राहुल वंजारी, दिपाली गोडघाटे 'एकायन हॉस्पीटल कोविड सेंटर सुरु केले आहे. या सेंटचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी तहसीलदार विजय तळेकर, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक राजेंद्र पाटील, भाजपनेते संदीप पाटील, जिल्हा परिषद सदस्य रविंद्र पाटील, अंकुश ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार माधवराव पाटील, वहाळ तंटामुक्ती समिती अध्यक्ष सिताराम नाईक, रमेश दापोलकर, वहाळ ग्रामपंचायत सदस्य चेतन घरत, डॉ राहुल वंजारी, डॉ दिपाली गोडघाटे, पोलिस अधिकारी इंगले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



## नागोठण्याजवळील शिहू येथे अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

### आरोपीला सात दिवसांची पोलिस कोठडी

**दै.रायगड नगरी । वाकण**

मुलगी अल्पवयीन आहे हे माहित असूनही तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ज्ञानेश्वर धावजी ठाकूर (वय.३५) रा. चोळे, मूळ रा. दादर, ता. पेण या आरोपीवर बालकांचे लैंगिक अत्याचारा पासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ४ व ६, भा.दं.वि. संहितेच्या कलम ३७६ व अन्य कलमाखाली नागोठणे पोलिस ठाण्यात ६ मे, २०२१ रोजी दुपारी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नागोठणे पोलिसांकडून आरोपीस अटक करुन आज रोहा येथील फौजदारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाकडून आरोपीस १३ मे पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

यासंदर्भात नागोठणे पोलिस ठाण्यातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार १३ वर्षे वय असलेल्या नागोठण्याजवळील चोळे (ता.पेण) येथील अल्पवयीन मुलीशी ती अल्पवयीन आहे हे माहीत असूनही आरोपी ज्ञानेश्वर ठाकूर याने तिच्याशी प्रेमसंबध ठेवले. तसेच तिला लग्नाचे खोटे आश्वासन देऊन तिच्याशी शिहू व दादर कडप्पे येथे २१ एप्रिल, २०२१ ते ६ मे, २०२१ दरम्यान शारीरिक संबंध ठेवले. नंतर त्या मुलीस आरोपीने फूस लावून पळवून नेल्याने सदर मुलीच्या काकीच्या तक्रारी वरुन पाली येथील महिला सहाय्यक पोलिस निरिक्षक तृप्ती बोराटे यांच्याकडून सदर गुन्ह्याची तक्रार घेण्यात आली.

या गुन्ह्यातील आरोपीस त्याच्या ..../२

## वैद्यकिय, आपत्ती, अपघात कारणांसाठी महापौर निधीतून अर्थसहाय्य मिळणार

### महापौर डॉ.कविता किशोर चौतमोल यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**


आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी वैद्यकिय कारणांसाठी तसेच अपघात किंवा नैसर्गिक आपत्तीच्या कारणांस्तव पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांसाठी लोकसहभागातून महापौर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीचा लाभ गरजूंनी घ्यावा असे आवाहन महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांनी केले आहे.

महापौर सहाय्यता निधी अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल गरजूंना गंभीर आजारांसाठी (कोविड-१९, हृदयरोग, मेंदू संबधित उपचार तसेच शस्त्रक्रिया, कॅन्सर संबधित शस्त्रक्रिया, ल्युकेमीया, थॅलेसीमीया, क्षयरोग, अवयव प्रत्यारोपण, डायलिसिस, बोनमॅरो) आर्थिक मदत करण्यात येईल. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या

| अंदाजित खर्च | अर्थसहाय्य |
|---|---|
| १ लाख | रु.५,000/- |
| १ लाख ते २ लाख | रु.१0,000/- |
| २ लाख ते ३ लाख | रू.१५.000/- |
| ३ लाख ते ४ लाख | रू.२0.000/- |
| ४ लाखाच्यावर | रू.२५.000/- |

आपत्तीग्रस्तांना, अपघातामुळे मृत्यू किंवा कायमस्वरूपी दुखापत, कायमस्वरूपी अंपगत्व आलेल्यानां आर्थिक मदत करण्यात येईल.

या महापौर निधीचा लाभ घेण्याकरिता महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील (वेबसाईटवरील) अर्ज डाऊनलोड करून घ्यावा. या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची सर्व माहिती याठिकाणी आहे. हा अर्ज आणि त्यासोबत लागणारी कागदपत्रे महापालिकेला



panvelcorporationgmail.com या ईमेलवरती पाठवावी.

नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी पालिकेच्या समितीद्वारे केली जाईल. त्यानंतर पात्र गरजूंना पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य करण्यात येईल.

## थोर समाजसुधारक स्व.जनार्दन आत्माराम भगत यांना अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या आज (शुक्रवार, दिनांक ०७ मे) ३३ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कोरोना विषाणू प्रादुर्भाव पाहता भगतसाहेबांची पुण्यतिथी सामाजिक अंतराचे नियम पाळून साध्या पद्धतीने साजरी करण्यात आली. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, सभागृहनेते परेश ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांच्यासह कुटुंबीयांनी भगत साहेबांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले.

जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट आहे. त्यांनी अहोरात्र जनतेची सेवा केली. फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, अशी शिकवण त्यांनी समाजामध्ये रूजवली.

भगत साहेबांच्या नावाने व आशिर्वादाने सुरू झालेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने दरवर्षी पुण्यतिथी सोहळा साजरा केला जातो. पण यंदाही कोरोना विषाणूचा संसर्ग लक्षात घेऊन संस्थेच्या शाखेत नियमांचे पालन करून संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, मुख्याध्यापिका इंदुमती घरत यांनी अभिवादन केले.



## कोव्हिड निगेटीव्हचे बनावट रिपोर्टस् बनविणारी टोळी गजाआड ; आरोपींना पाच दिवसांची पोलिस कोठडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कुठल्याही प्रकारचे स्वॅब न घेता हजार ते अडीच हजार रुपयांमध्ये कोवीड-१९चे थायरोकेअर लॅबचे कोव्हिड निगेटीव्ह टेस्ट असल्याचे बनावट रिपोर्ट तयार करुन देणाऱ्या टोळीतील तिघांना नवी मुंबई पोलिस गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाने सापळा लाऊन अटक केली आहे. या तिघांच्या मोबाईलमध्ये अनेक व्यक्तींचे बनावट कोव्हिड टेस्ट रिपोर्ट आढळुन आले आहेत. त्यामुळे या टोळीने अनेकांची बनावट कोव्हिड निगेटीव्ह टेस्ट रिपोर्ट देऊन फसवणुक केली असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गुन्हे शाखेकडून या तिघांची कसुन चौकशी करण्यात येत आहे.

खारघर सेक्टर-३५ मध्ये राहणाऱा साजीद दाऊद उपाध्ये (४७) हा अडीच हजार रुपयांमध्ये कोवीड-१९चे वेगवेगळ्या लॅबचे बनावट कोव्हिड निगेटीव्ह टेस्ट रिपोर्ट तयार करुन देत असल्याची माहिती गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी.कोल्हटकर यांच्या सुचनेनुसार गत ३ मे रोजी साजीद उपाध्ये याच्याकडे खाजगी व्यक्तीसह एका पोलीस कर्मचाऱ्याला कोव्हिडचे बनावट निगेटीव्ह टेस्ट रिपोर्ट तयार करुन घेण्यासाठी पाठवून देण्यात आले होते. त्यानुसार या दोघांनी साजीद उपाध्ये याची खारघर सेक्टर-३५ मध्ये भेट घेऊन त्याला बनावट कोव्हिड निगेटीव्ह टेस्ट रिपोर्ट बनवून देण्यासाठी आपले आधारकार्ड व मोबाईल नंबर दिले होते. तसेच त्यासाठी २ हजार रुपये रोख ऍडव्हान्स म्हणुन दिले होते. त्यानंतर साजीद उपाध्ये याने दोन दिवसानंतर त्यांना रिपोर्ट घेण्यासाठी येण्यास सांगितले होते.

त्यानुसार गुरुवारी दुपारी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश तांबे, सहाय्यक फौजदार संजय पवार व त्यांच्या पथकाने खारघर सेक्टर-३५ भागात सापळा लावला. यावेळी साजीद उपाध्ये याने तयार केलेले थायरोकेअर लॅबचे बनावट कोवीड निगेटीव्ह टेस्ट रिपोर्ट ..../२

# विकासाच्या नव्या वळणावर

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणामध्ये विलीन करण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयास लोकप्रतिनिधींकडून विरोध होत असला, तरी विकासाच्या बदलत्या प्रक्रियेत हे वळण अपरिहार्य आहे. संतुलित प्रादेशिक विकासाच्या कितीही गप्पा मारल्या, तरी राज्यात पुणे-मुंबई आणि नाशिक पट्ट्यात औद्योगिक विकासाचे केंद्रीकरण झाले, हे कटू वास्तव आहे. अतिरिक्त ताण आल्याने ही शहरे आणि परिसरात अनेक नागरी समस्या उभ्या राहिल्या आहेत. शिक्षण आणि रोजगाराच्या निमित्ताने हजारोंचे स्थलांतर झाल्याने येथील लोकसंख्यावाढ आणि त्यांना पुरविण्यात येणाऱ्या मूलभूत नागरी सुविधांचा वेग, हे प्रमाण व्यस्त झाल्याने, जुनी मानसिकता सोडून व्यावहारिक विचारास पर्याय नसल्याचेच हे निदर्शक आहे. शिक्षणाचे माहेरघर पुणे शहर हे पूर्वीपासून विकासाचे केंद्र होते. दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आग्रहाने शेजारील पिंपरी-चिंचवडमध्ये 'टेल्को' प्रकल्प आणला. पाठोपाठ अनेक देशी-विदेशी उद्योग, त्यांच्यावर अवलंबून हजारो लघुउद्योगांमुळे येथे उद्योगसंस्कृती बहरली आणि हजारो हातांना रोजगार मिळाला. या कामगारांची परिसरातच निवासाची व्यवस्था करण्यासाठी १९७२ मध्ये या प्राधिकरणाची स्थापना झाली. या भागात ४२ निवासी पेठा, चार मध्यवर्ती व्यापार केंद्रे अशा सुविधा विकसित करण्याचे नियोजन होते. आतापर्यंत यापैकी ३२ निवासी पेठा विकसित झाल्या असून, सुमारे ११ हजार घरे उभी राहिली आहेत. पुणे-मुंबई द्रुतगती महामार्ग, हिंजवडी व परिसरात माहिती तंत्रज्ञान उद्योगांची भरभराट, यांमुळे या परिसराच्या विकासाची गाडी सुसाट सुटली. विकास केंद्र म्हणून उदयास आलेल्या कोणत्याही शहरात विकसनावर मर्यादा येतात, तेव्हा लोकवस्ती आसपासच्या परिसरात वाढू लागते. अशा पंचक्रोशीमध्ये सुविधा पुरविणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवाक्याबाहेर जाते, असा अनुभव आहे. महापालिकांच्या आर्थिक मर्यादा, स्थानिक राजकारण, लालफीतशाही हे त्या विकासाच्या मार्गातील अडसर ठरतात आणि प्रचंड आर्थिक गुंतवणूक असलेले विकासाचे प्रकल्प हाती घेण्यावर मर्यादा येतात. यातून मार्ग काढण्यासाठी प्रथम मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाची (एमएमआरडीए) स्थापना झाली आणि मुख्यमंत्र्यांच्या थेट नियंत्रणाखाली असलेल्या स्वतंत्र यंत्रणेमार्फत अनेक मोठे प्रकल्प आकारास आले. त्याच धर्तीवर पुणे, पिंपरी-चिंचवड आणि परिसराच्या विकासासाठी 'पीएमआरडीए'ची कल्पना पुढे आली. अनेक वर्षे कागदावर राहिल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात ती प्रत्यक्षात आली. आता मुंबईप्रमाणे येथेही विकासप्रकल्प उभे राहणार, असे स्वप्न दाखविण्यात आले. कागदोपत्री अशा यंत्रणा उभ्या राहिल्या, तरी प्रत्यक्ष विकासासाठी कालबद्ध कार्यक्रम आखणे आणि मुख्य म्हणजे त्यासाठी आर्थिक तरतूद करणे, याकडे दुर्लक्ष करण्याची सरकारी परंपरा येथेही अनुभवास आली. 'एमएमआरडीए'ला वांद्रे-कुर्ला संकुलाच्या भूखंडांमधून आर्थिक प्राणवायू मिळाला, त्याप्रमाणे 'पीएमआरडीए'स उत्पन्नाचा ठोस स्रोत उपलब्ध झाला नाही. पीएमआरडीएकडे हिंजवडी मेट्रो वगळता केवळ बांधकाम परवानगी, अधूनमधून बेकायदा बांधकामांवर कारवाई आणि विकास आराखडा तयार करणे, एवढीच कामे आहेत. एका वर्तुळाकार रस्त्याचा प्रकल्प कागदावरच आहे. त्या पार्श्वभूमीवर प्राधिकरणाचे विलीनीकरण महत्त्वाचे ठरणार आहे. येथील भूखंडांच्या विकसनामधून पीएमआरडीएला आर्थिक स्थैर्य आणि अधिकारी-कर्मचारी वर्गही उपलब्ध होऊ शकेल. या निर्णयास काही लोकप्रतिनिधींचा विरोध असला, तरी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पीएमआरडीएच्या चक्रास गती देण्याचे संकेत यामधून दिले आहेत. आता दोन्ही शहरे व परिसरातील वाहतुकीचा प्रश्न सोडविणे, नवी विकासकेंद्रे उभी करून शिक्षण-रोजगारास चालना देणे, परवडणारी घरे बांधणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नियोजनबद्ध व शाश्वत विकासाच्या दृष्टीने पावले उचलणे, याकडे पीएमआरडीए लक्ष केंद्रित करेल, अशी अपेक्षा आहे. पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाच्या स्थापनेनंतरही या भागात अनेक वर्षे प्रलंबित राहिलेले प्रश्न सोडविण्याची लोकप्रतिनिधींची अपेक्षा चुकीची नाही. वेळेत भूसंपादन न केल्याने अनेक शेतकऱ्यांनी जमिनी विकल्या. आज तेथे उभ्या राहिलेल्या सुमारे दीड लाख घरांबरोबर अतिक्रमणे-वाढीव बांधकामांचा प्रश्न कायम आहे. आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, रस्त्यांचे जाळे उभारणे, भाडेपट्ट्यावरील जमिनींचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. पुण्याच्या विकासामध्ये साचलेपण येऊ लागल्याने भविष्यातील विकासाला पिंपरी-चिंचवड आणि मावळ-लोणावळ्यापर्यंत अशा पुणे-मुंबईपासूनच्या हाकेच्या परिसरातच वाव आहे, हे लक्षात घेऊन वेगाने योजना आखणे व त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. अन्यथा फक्त नवनव्या संस्थांची स्थापना केली, तरी विकासाबाबत 'पहिले पाढे पंचावन्न' असे म्हणण्याची वेळ येईल.

# चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील पाणलोट क्षेत्रात उभी राहते संरक्षण भिंत

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**



चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील खाडी किनाऱ्यावरील पाणलोट क्षेत्राच्या जागेवर विकासक संरक्षण भिंत उभी करत आहे. त्यामुळे पावसाळी निचरा होणारा नाल्यातील पाण्यास अडथळा निर्माण होणार आहे. तरी चिरनेर ग्रामपंचायत, उरण तहसील कार्यालय, उरण पंचायत समिती कार्यालय यांनी सदर विकासकावर कारवाई करावी. नाहीतर भविष्यात अशा बेकायदा बांधकामामुळे पाणलोट क्षेत्राच्या जागेवर अतिक्रमणाचा भस्मासुर बोकाळून चिरनेर वासियांना पुराच्या पाण्यात लोटेल अशी भिंती पुरग्रस्त नागरीक व्यक्त करत आहेत.

निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले चिरनेर हे इतिहास प्रसिद्ध गाव आहे. जेएनपीटी आणि नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या हाकेच्या अंतरावर हे गाव असल्याने अनेक विकासकांनी या परिसरात जमिनी संपादित करण्याचा घाट घातला आहे. त्या विकासकांना या गावातील शेतकरी बांधव हे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करत आहेत. परंतु गावात पावसाळ्यात वारंवार उध्दभवणाऱ्या पुर परिस्थितीचा अंदाज सदर विकासकांना नसल्याने हे विकासक ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला घेऊन नैसर्गिक नाले बदलून खाडीकिनाऱ्या वरील पाणलोट क्षेत्रातील नाल्याच्या स्त्रोतांजवळ दगड मातीचा भराव टाकून संरक्षण भिंत उभी करत आहेत. या पाणलोट क्षेत्राच्या संरक्षण भिंतीवर चिरनेर ग्रामपंचायतीने कारवाई केली नाही.

तर भविष्यात येणारे इतर विकासक हे या विकासकांचा पायना गिरवून पाणलोट क्षेत्राच्या जागेवर अशा प्रकारचे अतिक्रमण ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला घेऊन करतील, आणि अशा वाढत्या खाडीकिनाऱ्या (पाणलोट क्षेत्राच्या जागे) वरील बांधकामामुळे नाल्यातील पाण्याच्या निचऱ्यास अडथळा निर्माण होऊन गावातील रहिवाशांच्या घरात पुराचे पाणी शिरण्याचा धोका मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकतो. तरी भविष्यात ओढावणाऱ्या संकटावर मात करण्यासाठी व योग्य प्रकारे उपाययोजना करण्यासाठी ग्रामपंचायत, उरण तहसील कार्यालय उरण पंचायत समिती येथील अधिकारी वर्गाने सदर विकासकांवर कारवाई करावी अशी मागणी चिरनेर गावातील रहिवासी ना-गरीक करत आहेत.

# विविध ऑनलाईन स्पर्धांचा निकाल जाहीर

## वेशभूषा स्पर्धेत दुर्वा निचबाळकर प्रथम तर रुद्रा जाधव द्वितीय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मा.खा.लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त तालुकास्तरावर मराठी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वेशभूषा, चित्रकला आणि पोस्टर मेकींग (तक्ता बनविणे) आदी स्पर्धांचा यात समावेश होता. या स्पर्धांचा निकाल जाहीर झाला असून विद्यार्थ्यांनी आपली कलाकृती सादर करून स्पर्धेस भरघोस प्रतिसाद दिला.



यशस्वी विद्यार्थ्यांचे जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा.खा.लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय.टी.देशमुख, सचिव एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व संचालक, पदाधिकारी, मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. तसेच स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम धेतलेले सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पनवेल तालुक्यातील विविध मराठी प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

स्पर्धेचा निकाल

पूर्व प्राथमिक विभाग : वेशभूषा स्पर्धा

प्रथम : दुर्वा हर्षल निचबाळकर (मोठा शिशू) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, कळंबोली., द्वितीय : रुद्रा संदीप जाधव (मोठा शिशू) चांगू काना ठाकूर विद्यालय, न.पनवेल, तृतीय पूर्वा मनोज कांबळे (मोठा शिशू) चांगू काना ठाकूर, न.पनवेल, उत्तेजनार्थ कु.आर्या शिवलिंग कोरे (मोठा शिशू) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी कळंबोली.

प्राथमिक विभाग : चित्रकला स्पर्धा गट : इ.१ली/२ री प्रथम आराध्या भानुदास सुपेकर इ.पहिली, रा.जि.प.प्राथमिक शाळा, चिंचपाडा, द्वितीय स्वरा सचिन भिसे इ.दुसरी, चांगू काना ठाकूर विद्यालय, न.पनवेल, तृतीय आर्या समीर इंगळे इ.पहिली, रा.जि.प. प्राथमिक शाळा, न्हावेखाडी, उत्तेजनार्थ ओम ज्ञानेश्वर भोईर इ.पहिली, को.ए.सो.व्ही.के. हायस्कूल, पनवेल.

प्राथमिक विभाग : पोस्टर मेकींग (तक्ता बनविणे) स्पर्धा : गट ३ री/४ थी प्रथम : सर्वज्ञ साईनाथ कोटलवार इ.४ थी, चांगू काना ठाकूर विद्यालय, न.पनवेल, द्वितीय तनिष्का तुषार जाधव इ.४ थी को.ए.सो.दत्तुशेठ पाटील प्राथमिक शाळा, पनवेल, तृतीय ध्रुती रुपेश ठाकूर इ.४ थी, राजिप प्राथमिक शाळा, न्हावेखाडी, उत्तेजनार्थ खुशी नानासाहेब मरकडे इ.३री चांगू काना ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल.

# दिव्यांग व्यक्तींना ऑफलाईन नोंदणी करून लसीकरण करा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिव्यांग व्यक्तींना आठवड्यातील एक दिवस आणि एक ठिकाण ठरवून ऑफलाईन नोंदणी करून लसीकरण करण्याची मागणी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी निवेदनादवारे आयुक्तांकड़े केली आहे.



पनवेल महानगरपालिका हद्दीत सद्या १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांच्या लसीकरणास सुरुवात केलेली असून cowin.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून शेडूल बुक केल्यावरच नोंदणी होत आहे. तसेच लसीकरण केंद्रावर गर्दी होत असल्याने त्याचा त्रास दिव्यांग व्यक्तिना होण्याची शक्यता आहे. बऱ्याच दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन नोंदणी करणे शक्य होत नसल्याने त्यांच्यासाठी आठवड्यातील एक दिवस आणि एका ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने नोंदणी करून लसीकरण करावे. अशी महत्वाची मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी केली आहे. दिव्यांग व्यक्तीची रोग प्रतिकार शक्ती सामान्य व्यक्तीच्या तुलनेत कमी असल्याने कोरोना विषाणूचा अधिक धोका असतो, ही बाब लक्षात घेत दिव्यांग व्यक्तींना कोरोना तपासणी, लसीकरण तसंच आवश्यक उपचारासाठी रांगेत उभं रहावं लागू नये; तसंच कोरोनाचा संभाव्य धोका कमी व्हावा यासाठी या सर्व ठिकाणी त्यांना प्राधान्य दिलं जावे अशी मागणी प्रितम म्हात्रे यानी केली आहे.

# बाजारात डुप्लीकेट कापुरची सर्रास खुलेआम विक्री

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना महामारीत कापुरला दिवसेगणीक वाढती मागणी पाहता बहुतांश ठिकाणी डुप्लीकेट कापुर विक्रीला उधाण आले असल्याचे बोलले जात आहे.



कोरोना काळात बहुतांश नागरीक आप आपल्या घरांत जंतुसंसर्ग होऊ नये या करीता विविध ठिकाणी कापुराच्या वड्या ठेवत आहेत. तसेच कापुराचा मोठ्या प्रमाणात घरात सायंकाळी अथवा आरती वगैरे असेल किंवा धुपारतीत कापुराच्या वड्यांचा वापर करीत असतात.

कोरोना काळात आपल्या घरांत कापुर ठेवल्याने हवेतील वातावरण शुद्ध होते असे मानले जाते याचाच फायदा घेऊन गेल्या वर्षीच्या कोरोना लाटेपासुन बाजारात कापुराची विक्री विक्रमी होत असल्याचे व्यापारी वर्गाचे म्हणणे आहे सर्वात शुद्ध व नामवंत कापुर म्हणून भीमसेन कापुर ओळखला जातो सध्या या कापुराकडे ग्राहकांचा खरेदी करण्याचा कल मोठ्या प्रमाणावर वाढला असल्याचे बोलले जात आहे. भीमसेन कापुराचा बाजार भाव साधारण १८०० रूपये प्रती किलो असा आहे शुद्ध कापुराची वडी ओळखण्याचे सोपे तंत्र म्हणजे ही वडी ग्राहकाने हातात घेतल्यावर ती पुर्ण पारदर्शक साधारण काचेसारखी दिसते. तसेच ह्या कापुराच्या वडीला अत्यंत हलका दाब दिल्यास त्या वडीचा तात्काळ पुर्णता बारीक चुरा होतो व त्या कापुराचा सुगंधही ग्राहकाला खुप चांगला येतो परंतु बाज-ारात अनेक कापुर कंपन्यानी डुप्लीकेट स्वस्त कापुर विक्री करीता ठेवला आहे या कापुराच्या वडीला मोठ्या प्रमाणात जोर दिला असता त्या वडीचा भुगा होत नाही कारण बहुतांश कापुर कंपन्या सदर कापुर वडीत मेणाचा वापर करीत असल्याने तो जाळला असताना देखील भिमसेन कापुरची सर त्या बाजारातील कापुर वडीला येत नसल्याचे काही सुज्ञ ग्राहकांचे म्हणणे आहे तरी शासनाने डुप्लीकेट कापुर विक्रीला लगाम लावावा अशी मागणी ग्राहक वर्गाकडुन केली जात आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## एनडी स्टुडिओमधील सेटला आग ; मोठ्या प्रमाणात नुकसान

तासाभराच्या शर्ती नंतर आग आटोक्यात आणली. या आगीच्या घटनास्थळी तहसीलदार इरेश चप्पलवार पोलीस निरीक्षक अनिल विभूते, सहा. पो नि बांगर, येथील जिल्हा परिषदेचे सदस्य मोतीराम ठोबरे यांनी भेट देऊन कर्जत नगरपालिका, एम आय डी सी पातळगंगा व बॉम्बे टॅग कंपनी, खोपोली नगरपालिका अग्निशामक दलाल पाचारण केले तर अनेक सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या कार्यकर्त्यांनी मदत कार्य केले.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

दादर येथील मूळ गावातून गुरूवारी (दि.६) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अटक करण्यात आले. आरोपीला अटक करण्यासाठी गेलेल्या नागोठणे पोलिस ठाण्याच्या पथकात सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक मोहन म्हात्रे, पोलिस हवालदार जितेंद्र चव्हान, पोलिस नाईक नितीन गायकवाड व पो.शिपाई रामनाथ ठाकूर यांचा समावेश होता.

या गुन्ह्याची माहिती मिळताच रोहाचे उपविभागीय पोलिस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी यांनी नागोठणे पोलिस ठाण्यात गुरूवारी सायंकाळी भेट देऊन सदर गुन्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. याप्रकरणी नागोठण्याचे पोलिस निरिक्षक दादासाहेब घुटुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो. नि. विजयकुमार देशमुख हे पुढील तपास करीत आहेत.

## बनावट रिपोर्टस् बनविणारी टोळी गजाआड

खाजगी व्यक्तीला दिल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याला अनिकेत दुधावडे (२१) याने सदरचे निगेटीव्ह टेस्ट रिपोर्ट तयार करुन दिल्याचे सांगितले.

त्यानुसार पोलिसांनी अनिकेत दुधावडे याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर राहुल पांडे (२३) याने सदरचे रिपोर्ट तयार करुन दिल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याला देखील ताब्यात घेऊन तिघांवर खारघर पोलीस ठाण्यात फसवणुक व बनावट रिपोर्ट तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन तिघांना अटक केली. न्यायालयाने या तिघांची येत्या मंगळवारपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

या कारवाईत अटक करण्यात आलेला साजीद उपाध्ये हा कोवीड-१९चे बनावट निगेटीव्ह रिपोर्टची गरज असलेल्या गिऱ्हाईकांचा शोध घेऊन त्यांची माहिती तो अनिकेत दुधावडे याला देत होता. त्यानंतर अनिकेत, राहुल पांडे याला सदरची माहिती देऊन त्याच्याकडून संबधित व्यक्तींचे थायरोकेअर लॅबचे कोवीड-१९चे बनावट निगेटीव्ह टेस्ट रिपोर्ट तयार करुन घेत होता.

एक बनावट टेस्ट रिपोर्ट तयार करुन देण्यासाठी हि टोळी एक हजार ते अडीच हजार रुपये संबधितांकडून घेत असल्याचे तपासात आढळून आले आहे. या तिघांच्या मोबाईलमध्ये अनेक व्यक्तींचे बनावट टेस्ट रिपोर्ट आढळुन आले आहेत. त्यामुळे या तिघांनी अशाच पद्धतीने अनेक व्यक्तींना बनावट कोव्हिड टेस्ट रिपोर्ट तयार करुन दिल्याचे तपासात आढळुन आले आहे.

# आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतला 'माझी वसुंधरा' पर्यावरण उपक्रम नवी मुंबई व रायगड औद्योगिक वसाहतीत राबविला जाणार !

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१ जानेवारी २०२१ रोजी शासनाच्या 'माझी वसुंधरा' ह्या वसुंधरेच्या संरक्षण व संगोपनाच्या उपक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत झाला. माझी वसुंधरा योजनेतून प्रत्येकाने मी झाडे लावणारच आणि संगोपन करून पर्यावरणात बदल घडवून आणायची शपथ घ्यायची आहे. हा उपक्रम शासनाच्या सर्व विभागातून सुरू करून निसर्गातील पंचमहाभूतांवर कार्य करणे अपेक्षित आहे म्हणून, ह्याच उपक्रमाच्या माध्यमातून युवासेनेचे राष्ट्रीय सह सचिव रुपेश पाटील यांनी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली 'माझी वसुंधरा' हा पर्यावरण संरक्षण कार्यक्रम नवी मुंबई व तळोजा औद्योगिक क्षेत्र येथील औदयोगिक वसाहतीत राबविण्याचा मानस केला आहे.

ह्याच संदर्भात जनजागृती व ह्या योजनेची माहिती औद्योगिक कंपन्या, फॅक्टरी, जिथे प्रदूषण प्रादुर्भाव होत आहे व तिथेच माझी वसुंधरा मोहिमेचे महत्व पोहचण्यासाठी लवकरच ह्या उपक्रमा अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ नवी मुंबई चे डी बी पाटील आणि तळोजा इंडस्ट्री असोसिएशनचे सतीश शेट्टी यांच्या सहयोगाने झाडे संगोपन, संरक्षण, ह्यासाठी ठोस मोहीम राबविण्यात येणार आहे. रुपेश पाटील यांनी ह्या योजनेच्या प्रसारा करिता काही योजना आखल्या आहेत, आपल्या कार्यालयात, घरात, डेस्क अथवा इतर इनडोअर जागी एक मग डिझाइन केला आहे त्यावर 'माझी वसुंधरा लोगो, झाडे लावा पृथ्वी वाचवा असा मेसेज दिला असून त्या छोट्या मग मध्ये एक छोटे इनडोअर प्लांट दिले गेले आहे. रुपेश पाटील यांच्या मते हे झाड लावलेला मग प्रत्येकाला गिफ्ट देऊन पर्यावरणाचा संदेश देता येणार आहे. आणि त्यातून झाड लावण्याची प्रेरणा दिली जाणार आहे. ह्याच योजने अंतर्गत एक वेब लिंक देण्यात आली असून त्या लिंकवर जाऊन आपण एक प्रतिज्ञा घायची आहे त्यात आपण ५ झाडे लावून मी त्याचे संगोपन करणार अशी प्रतिज्ञा असून ती घेणाऱ्यास शासनाचे आणि ह्या योजनेचे एक सर्टिफिकेट मिळणार असून त्यातून आपण पर्यावरण मित्र होणार आहेत.

ही संपूर्ण योजना कारखाने, शाळा, घरोघरी पोहचावे ह्या करिता हा उपक्रम घेण्यात येत असून ह्याची सुरुवात प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सोबत व औद्योगिक क्षेत्र तळोजा अंतर्गत लवकरच करण्यात येणार आहे. प्रदूषण मंडळाचे रिजनल ऑफिसर डी बी पाटील यांना 'माझी वसुंधरा' मग व एक झाड देऊन ह्या योजनेची सुरुवात कोकण भवन येथे करण्यात आली आहे.


## रायगड जिल्ह्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ संकुलात

# पर्यटन व खादी ग्रामोद्योग विभागासाठी स्वतंत्र दालन निर्मितीसाठी प्रयत्नशील : आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यामध्ये विकसित करण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या संकुलात पर्यटन विभागातर्फे पर्यटन संचालनालय व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत संचलित पर्यटन दालनासाठी आणि महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग महामंडळाच्या दालनासाठी पुरेशी जागा निश्चित करून उपलब्ध करुन देण्याबाबत सिडको प्रशासनास आदेशित करण्याची मागणी पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री व वित्त व नियोजन मंत्री ना.श्री. अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील आंतरदेशीय व आंतरराष्ट्रीय हवाई वाहतुकीचा भार कमी करणे व हवाई वाहतुकीच्या अत्याधुनिक सुविधा निर्माण करणे, या दृष्टीने सिडकोमार्फत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची निर्मिती करण्यात येत आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे आधुनिक वास्तुकलेचा एक उत्कृष्ट आविष्कार ठरणार आहे. या ठिकाणी येणाऱ्या आंतरदेशीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी पुरोगामी महाराष्ट्राची ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक चळवळ आणि पर्यटन विकासाचा वारसा दर्शविणारे दालन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दर्शविला असून याबाबत नगरविकास विभाग व सिडको प्रशासनाची बैठक लवकरच आयोजित केली जाईल, असे सूचित केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक: **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## फोटो काढण्यावरुन तिघांनी केली एका इसमास मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोसायटीमधील मागील गेटवरुन उडी मारुन येत असलेल्या तिघांचे फोटो काढले याच्यावरुन एका इसमास या तिघा जणांनी मिळून शिवीगाळ करून धमकी देवून हाताबुक्क्यांनी व धातूच्या फाईटने मारहाण करून त्यांना दुखापत केल्याची घटना पडघे येथील कृष्ण पार्क सोसायटीमध्ये घडली आहे.

येथे राहणारे अमरकांत पासवान (३५) यांच्या सोसायटीमध्ये तीन अनोळखी मुले सोसायटीच्या मागील गेटवरुन उडी मारुन येत असल्याचे पाहून त्यांनी त्यांचे फोटो काढू लागले असता या तिघांनी मिळून त्यांना शिवीगाळ करून धमकी देवून हाताबुक्क्यांनी व धातूच्या फाईटने मारहाण करून त्यांना दुखापत केल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

## संत गोरा कुंभार बागेतील शेणकीमुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर ? नगरपरिषदेचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या संतगोरा कुंभार बागेत शेणकीने आसरा घेतला असल्याने दुर्गंधीमुळे आजूबाजूच्या नागरिकांना याचा त्रास होत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.याकडे नगरपरिषदेच्या संबंधित आरोग्य खात्याचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याबाबत नाराजी व्यक्त होत आहे.



राज्यात व जिल्ह्यात कोरोना रोगाचा प्रादुर्भाव व वाढती रुग्ण संख्या चिंतेची बाब असून त्यात भरीस भर म्हणून गेल्या अनेक दिवसांपासून संतगोरा कुंभार बागेत बिनदिक्कतपणे टाकण्यात आलेल्या शेणकीमुळे परीसरात दुर्गंध पसरत असून परीसरातील आजूबाजूच्या नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.नगरपरिषदेच्या संबंधित आरोग्य खात्याने यात लक्ष पुरवून संतगोरा कुंभार बागेतील शेणकी तातडीने हटविण्यात यावी. अशी मागणी आजूबाजूच्या नागरिकांकडून होत आहे.

# सोनारी, करळ, सावरखार गावात केमिक्सलचे टँकर वॉशिंगमुळे परिसरात दुर्गंधी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जेएनपीटी परिसरातील सोनारी गावात सुरु असलेल्या बेकायदेशीर सर्विस सेंटरमुळे गावात दुर्गंधी पसरली असून, करळ, सोनारी सावरखार या तीन गावांसह परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, केमिकलयुक्त पाणी नाल्यावाटे सोडण्यात येतआहे. त्यामुळे मोठया प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. हे तिन्ही सर्विस सेंटर बेकायदेशीर असून, शासनाची परवानगी नसतांनाही खुलेआमपणे सुरू आहे.

यावर शासन गप्प कसे, अनेकदा याबाबत शासन दरबारी पत्रव्यवहार करून सुद्धा, शासकीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊनही या बेकायदेशीर व प्रदूषण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या तिन्ही सेंटरवर आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही याबदल सोनारी ग्रामपंचायतचे सदस्य अंकुश तांडेल यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. अंकुश तांडेल यांनी याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाशी पत्रव्यवहार केला होता. याबाबतची पाहणी करण्यासाठी आलेले अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता ,सदर सर्विस सेंटर बेकायदेशीर असून यामुळे प्रदूषण कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले आहे.

सदर सर्व्हिस सेंटरद्वारे प्रदूषण कायद्याचे उल्लंघन होत असून दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे अहवाल वरिष्ठांना दिले आहेत. त्यामुळे लवकरच या तिन्ही बेकायदेशीर अनधिकृत सर्व्हिस सेंटरवर आता लवकरच कायदेशीर कारवाई होणार आहे. तसे अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठांकडे अहवाल सादर केला आहे. विशेष म्हणजे कोरोना काळात किराणा आणि मेडिकल सोडून बाकी सगळ्या आस्थापना बंद असतांना सर्विस सेन्टर बिनधास्तपणे चालू कसे आहे? ह्यावर उरण प्रशासन गप्प कसे असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



# भाजपा कार्यकर्त्यांवर हल्ला ; भा.ज.पा.तर्फे मुरुड तहसिलदारांना निवेदन



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकी निकालानंतर भाजपा कार्यकर्त्यांवर झालेल्या हल्ला व हत्येसंदर्भात महाविकास आघाडीने कोणताही प्रतिसाद न दिल्या बाबत मुरुड तालुका भारतीय जनता पार्टी तर्फे जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला असून तहसीलदार गमन गावित यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, नुकत्याच झालेल्या पश्चिमबंगालच्या विधानसभा निवडणुकीमध्ये तृणमूल काँग्रेसने विजय मिळवला आहे, या बद्दल मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ममता बॅनर्जींचे अभिनंदनही केले आहे , या बाबत भाजपा चे मुरुड तालुका संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर यांनी सांगितले कि ' निवडणुकीमध्ये जय पराजय होतच असतो, पराजय झाला म्हणून निराश व्हायचे नसते तसेच विजय झाल्यावर उन्माद करायचा नसतो परंतु तृणमूल काँग्रेसच्या पाठीराख्यांनी सर्व राजकीय संकेत बाजूला ठेऊन भाजपा च्या कार्यकर्त्यांवर खुनी हल्ले करत आहेत , इतक्या मोठ्या प्रमाणात हल्ले होत असताना पुरोगामी महाराष्ट्राच्या सत्ताधारी पक्षाच्या एकही मंत्र्याने अथवा पदाधिका-यांनी याबाबीचा साधा निषेध सुद्धा केलेला नाही, याचाच अर्थ या हल्ल्यांना महाविकास आघाडीतील पक्षांची मूकसंमती आहे हे सिद्ध होत आहे , पश्चिम बंगाल मधील भाजपाच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या मागे दक्षिण रायगड जिल्यातील सर्व पदाधिकारी ठामपणे उभे असून या हल्ल्याचा तसेच या बाबत मूग गिळून गुपचूप बसलेल्या महाराष्ट्रातील तिन्ही पक्षांचा जाहीर निषेध मुरुड तालुका भाजपा करीत आहे.' यासंदर्भातील निषेध पत्र भाजपा चे मुरुड शहर अध्यक्ष उमेश माळी यांच्या हस्ते मुरुडचे तहसीलदार गमन गावित यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले व त्याची प्रत विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस व भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष महेश मोहिते यांना पाठवली आहे , त्या प्रसंगी तालुका संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, तालुका उपाध्यक्ष महेश मानकर , तालुका सरचिटणीस नरेश वारघे , शहर यूवा मोर्चा अध्यक्ष अभिजित पानवलकर उपस्थित होते , त्यावेळी त्यांनी मुरुड तालुक्यातील कोविड १९ आजारावरील लसीकरण मोहीम सुरळीत होणेकरिता व नागरिकांची गैरसोय टाळण्याकरिता तालुक्यातील त्या त्या विभागातील नजीकच्या आरोग्य केंद्रावर लसीकरण होण्याबाबत तहसीलदार यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

# पैशाच्या देवाण-घेवाणीवरुन तरुणावर प्राणघातक हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल भागात राहणाऱ्या रविंद्र मंडल (३५) याला त्याच्या ओळखीतील त्रिकुटाने पैशाच्या देवाण-घेवाणी वरुन बेदम मारहाण करुन तसेच त्याच्या डोक्यात दगड टाकून त्याला मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. सदर मारहाणीत रविंद्र मंडल गंभीर जखमी झाल्याने पोलिसांनी त्याला मुंबईतील जे.जे. रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. त्यानंतर पोलिसांनी तिघा मारेकऱ्यांवर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्यापैकी दोघांना अटक केली आहे.

सदर घटनेतील गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव रविंद्र मंडल उर्फ लाल्या असे असून त्याचा राजू कुंवर याच्यासोबत पैसे देण्या- घेण्यावरुन वाद झाला होता. राजू कुंवर याला देण्यासाठी असलेले पैसे त्याने दारु पिण्यामध्ये उडवून टाकले होते. त्यामुळे राजू कुंवर, राजू विश्वकर्मा आणि त्यांचा तिसरा साथीदार या तिघांनी रविंद्र मंडल याला पनवेल मधील मिरची गल्लीमध्ये अडवून त्याला लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यावेळी राजू कुंवर याने रविंद्रच्या डोक्यामध्ये दगड घालून त्याला मारुन टाकण्याचा प्रयत्न केला. सदर मारहाणीत रविद्र गंभीर जखमी झाल्यानंतर तिघा मारेकऱ्यांनी तेथून पलायन केले होते. सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी रविंद्र याला उपचारार्थ जे.जे. रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी सदर घटनेतील तिघा मारेकऱ्यांवर कलम ३०७ नुसार गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी या मारेकऱ्यांची माहिती मिळवून त्यापैकी राजू कुंवर आणि राजू विश्वकर्मा या दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी आता फरार असलेल्या त्यांच्या साथीदाराचा शोध सुरु केला आहे.

# ओव्हरहेड क्रेनमधून लोखंडी स्लीड कॉईल पडून कामगाराचा मृत्यू

## क्रेन ऑपरेटर व सुपरवायझर विरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसीतील तळोजा स्टील सर्व्हीस सेंटर कंपनीमध्ये ओव्हरहेड क्रेनमधुन लोखंडी स्लीड कॉईल खाली उभ्या असलेल्या कामगाराच्या अंगावर पडून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. सदर कंपनीतील ओव्हरहेड क्रेनवरील ऑपरेटर व सुपरवायझर या दोघांनी काम सुरु असताना आवश्यक ती खबरदारी न घेतल्यामुळे सदरची दुर्घटना घडल्याचे तपासात आढळुन आले आहे. त्यामुळे तळोजा पोलिसांनी सदर घटनेला या दोघांना जबाबदार धरुन त्यांच्यावर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

तळोजा एमआयडीसीतील तळोजा स्टील सर्व्हीस सेंटर या कंपनीमध्ये लोखंडी कॉईल पँकिंग करण्याचे काम सुरु होते. त्यासाठी ओव्हरहेड क्रेनमधुन लोखंडी स्लीड कॉईल एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी नेण्यात येत होते. मात्र यावेळी अचानक ओव्हरहेड क्रेन नादुरुस्त होऊन त्याच्यामधुन लोखंडी स्लीड कॉईल निसटून ते खाली उभ्या असलेल्या इमादुल इशाउद्दीन गाझी (४५) या कामगाराच्या अंगावर पडले. या दुर्घटनेत इमादुल गाझी याचा मृत्यू झाल्याने तळोजा पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करुन या घटनेचा तपास सुरु केला होता. या तपासात कंपनीतील ओव्हरहेड क्रेनचा ऑपरेटर सिनीयर फिटर सुनिल सिंग याने ओव्हरहेड क्रेन ऑपरेट करत असताना क्रेनच्याजवळ कुणी व्यक्ती येऊ नये याची तसेच क्रेन ऑपरेट करीत असताना, लक्ष ठेवण्यासाठी एखाद्या व्यक्तीला सदर ठिकाणी थांबविले आवश्यकत होते. तसेच सदर कामाचे सुपरवायझर टुटुळ गाजी याने देखील काम सुरु असताना, आवश्यक ती खबरदारी घेणे आवश्यक होते. परंतु या दोघांनी क्रेनचे काम सुरु असताना आवश्यक ती खबरदारी न घेतल्यामुळे सदरची दुर्घटना घडल्याचे तपासात आढळुन आले. त्यामुळे पोलीस उपनिरीक्षक कृष्णा कुटे यांनी स्वत: या प्रकरणात फिर्यादी होऊन ओव्हरहेड क्रेनवरील ऑपरेटर सुनिल सिंग व सुपरवायझर टुटुळ गाजी या दोघांविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## पिकअप गाडीची धडक बसल्याने इसम ठार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या ट्रकवर पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या महिंद्रा पिकअप जीपची धडक बसल्याने झालेल्या अपघातात एक इसम ठार झाल्याची घटना पनवेल जवळील कर्नाळा दरबार हॉटेल परिसरात घडली आहे.

पिकअप चालक सुरज गुरव (२५) व संतोष गावडे (४२) हे पनवेल येथून कोकणात पहाटेच्या वेळी जात असताना कर्नाळा दरबार हॉटेल जवळ रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या ट्रकवर यांची गाडी जावून आदळल्याने झालेल्या अपघातात जीपमधील संतोष गावडे हे गंभीररित्या जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला आहे.

# माथेरानमध्ये १८ वर्षावरील नागरिकांचे लसीकरण करण्याबाबत पत्रकार मिलिंद कदम यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान सारख्या छोट्याशा पर्यटनस्थळावर कोरोनाने डोके वर काढायला सुरुवात केली आहे. दरदिवशी चार ते पाच कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण सापडत आहेत. शासनाने व्याक्सिनची सोय माथेरान नगरपरिषदेच्या दवाखान्यात उपलब्ध केलेली असताना आजपर्यंत केवळ जेष्ठ नागरिक आणि ४५ वर्षावरील नागरिकांनी याचा लाभ घेतला आहे. अद्यापही बहुतेक लोक या व्हॅक्सिनचा डोस घेण्यासाठी पुढे येत नाहीत. नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, मुख्याधिकारी प्रशांत जाधव हे वारंवार नागरिकांना आवाहन करीत असताना काही मंडळी त्याकडे जाणूनबुजून कानाडोळा करीत आहेत परिणामी माथेरान बाहेरील लोक याचा लाभ घेण्यासाठी इकडे येत आहेत.



शासनाने रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल याठिकाणी १८ वर्षावरील नागरिकांना व्याक्सिनची सोय उपलब्ध केलेली असताना माथेरान मध्ये अद्याप १८ वर्षावरील नागरिकांना ही लस दिलेली नसल्याने शेवटी माथेरान प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष पत्रकार मिलिंद कदम यांनी जिल्हाधिकारी रायगड याांना दि. ६रोजी लेखी निवेदन मेल द्वारे पाठविले आहे. पत्रकार मिलिंद रामचंद्र कदम यांनी निवेदनात म्हटले आहे की, माथेरान हे एक दुर्गम पर्यटन स्थळ आहे. येथे सध्या ४५ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण सुरू आहे. त्यातील बहुतेक लसीकरण आता संपत आलेले आहेत व माथेरानमध्ये लसी उपलब्ध असल्याने माथेरान बाहेरील मंडळी आता लसीकरणास येथे येऊ लागल्या आहेत त्याने माथेरान करांना धोका निर्माण होऊ शकतो येथील स्थानिक कोरोनामुक्त माथेरान व्हावे ह्याकरता प्रयत्न करीत असताना आशा प्रकारे बाहेरील व्यक्ती ना प्रवेश नाकारला पाहिजे व जर लसी जास्त प्रमाणात उपलब्ध आहेत तर १८ वर्षा वरील नागरिकांना लसीकरण केले जावे कारण माथेरान मधील लसी संपल्यास येथील नागरिकांना माथेरान बाहेर जाऊन लस घेणे शक्य होणार नाही ही खर्चिक गोष्ट होऊ शकते व सध्या १८ वर्षावरील कोरोना बाधित रुग्णाची संख्या वाढू लागल्याने आपन ह्याचा जिल्हाधिकारी यांनी सहानभूती पूर्वक विचार करावा असे म्हटले आहे. त्यामुळे पत्रकारांच्या या निवेदनावर नक्कीच विचार करून जिल्हाधिकारी मार्ग काढतील असा विश्वास माथेरान प्रेस क्लबच्या सदस्यांसह गावातील १८ वर्षावरील नागरिकांना वाटत आहे.

# पाली खोपोली राज्य महामार्गाचे रुंदीकरणाचे काम संथगतीने व नित्कृष्ट दर्जाचे

## सुधागड रिपाइंच्या वतीने आंदोलनाचा इशारा, एम.एस.आर.डी.सी प्रशासनाला निवेदन सादर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

वाकण पाली खोपोली राज्य महामार्ग ५४८ (अ) रुंदीकरणाचे काम मागील काही वर्षांपासून सुरु आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महा मंडळाच्या अंतर्गत चालू असलेले पाली फाटा ते वाकण या राज्य महामार्गाचे रुंदीकरण व काँक्रीटीकरणाचे काम हे अत्यंत निकृष्ठ दर्जाचे व कासव गतीने चालू आहे. याविरोधात आर पी आय(आठवले) सुधागड तीव्र आंदोलनाच्या पवित्र्यात आहे.

याबाबतचे पत्र रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री ना.डॉ.रामदासजी आठवले व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपअभियंता सचिन निफाडे यांना गुरुवार दि.(०६ )रोजी निवेदन देण्यात आले. पाली खोपोली राज्य महामार्गाच्या दुरावस्थे बाबत रिपाइं आक्रमक झाली आहे. सतत बदलणाऱ्या ठेकेदारांनी केलेल्या चुका व कामाच्या अयोग्य पध्दतीमुळे महामार्ग रंदिकरणाच्या कामाची पुरती वाट लागून गेली. वाकण पाली खोपोली मार्ग रुंदीकरणादरम्यान अनेक ठिकाणी रस्त्याच्या मधोमध असुरक्षित व धोकादायक खोदकाम केले आहे. त्यामुळे दिवस व रात्री जीवघेण्या अपघाताची भीती निर्माण झालीय. रस्त्याचे काम सुरू असल्याचे फलक व कमजोर पट्ट्या देखील तुटून पडल्या आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. वाकण पासून पालीफाटापर्यंत ठिकठिकाणी रस्त्याची चाळण झाली आहे. या मार्गाची तकलादू डागडुजी करण्यात येते, मात्र आजमितीस पुन्हा महामार्गाची जैसे थे अवस्था झाली आहे. वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेला व मुंबई गोवा महामार्गाला पर्याय मानला जाणारा हा मार्ग नेहमीच दुरावस्थेत राहिला आहे. लोकप्रतिनिधी व शासनाने या मार्गाला पोरकेपणाची वागणूक देत दुर्लक्षित ठेवले. रस्त्याच्या समस्येने नागरिक संतापले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता हे समजण्यापलिकडे झाले आहे. पाली खोपोली मार्गाने आजवर अनेक निष्पाप जीवांचे बळी घेतले आहेत.

सद्यस्थितीत या महामार्गाची प्रचंड दुर्दशा झाली असून हा मार्ग प्रवास करण्यालायक राहिला नाही अशी परिस्तीती दिसून येत आहे. याउलट मुंबई गोवा महामार्गाचे समाधानकारक चौपदरीकरण होत असल्याने या मार्गाचे रुंदीकरण केव्हा पूर्ण होणार असा सवाल विचारला जात आहे. सद्यस्थितीत हा मार्ग जागोजागी खोदून ठेवला आहे, शिवाय सुरक्षेच्या दृष्टीने खबरदारी देखील घेतली जात नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या मार्गावरुन प्रवास करणार्या प्रवाशांना जिव मुठीत घेवून प्रवास करण्याची नामुष्की ओढवली आहे. या मार्गावरून प्रवास



करणाऱ्या नागरिकांना मान, पाठ, कंबर, व मणक्यांच्या आजाराने ग्रासले आहे. तर खड्ड्यामुळे वाहनात बिघाड होऊन खिशाला कात्री बसत आहेच ,याबरोबरच मानसिक व शारीरिक त्रास देखील असह्य असल्याचा संताप रिपाइं पदाधिकारी राहुल सोनावळे व रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी व्यक्त केला आहे. या मार्गाचे जलद व दर्जेदार रुंदीकरण व्हावे अशी मागणी सुधागड रिपाइं च्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी रिपाइं रायगड जिल्हा सरचिटणीस रवींद्रनाथ ओव्हाळ ,सुधागड तालुका अध्यक्ष राहुलभाई सोनावळे, युवक अध्यक्ष पत्रकार निशांत पवार उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल हे श्री.कांतीलाल लालजी परमार यांच्याकडून त्यांचे खालील नमूद केलेली मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत. मिळकतीचा तपशिल खालील वर्णनाची मिळकत.

| युनिट क्र. | इमारतीचे नाव | भूखंड क्रं. | सेक्टर क्र. | युनिट क्षेत्रफळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| २३ | सह्याद्री को.हौ. सो.लि. | सी १७ | ०६ | ३२.०० चौ.मी. बांधीव | नवीन पनवेल ता.पनवेल जि.रायगड नवीमुंबई |

सदर मिळकतीसंबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, करारनामा, बक्षिसपत्र, खरेदीखत, साठेकरार इ.कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असल्यास त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सूचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदरची सदनिका ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहे असे मानण्यात येईल आणि आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

दि.०७/०५/२०२१

**सही/-**
**कुसुम किरण घरत**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**पत्ता : शॉप नं.१, हेमकुंज बिल्डींग, प्लॉट नंबर २२, सेक्टर ८, खांदा कॉलनी, पनवेल**
**मो.नं.९९६७३३५०४६**

## संक्षिप्त...

# माथेरान नगरपरिषदेचे कामगार कायम सेवेत रुजू



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांचा परिक्षावधीन कालावधी समाप्त करून काही लिपिक तसेच काही सफाई कामगारांना नियमित सेवेत रुजू करण्यात आले आहे. यामध्ये काहीजण हे वारसा हक्काने कामावर रुजू होते.

लिपिक जयवंत वर्तक, लिपिक अजय साळुंखे, तर सफाई कामगार म्हणून दीपा सोनावले,चैताली चव्हाण, अनु सारसर,अर्जुन मुदलियार, हिमांशू सोनावले, अनिल ढोले, रवी लोटणकर या कामगारांना कायमस्वरूपी नियमित करण्यात आले आहे.

त्यामुळे या सर्व कामगारांनी मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव, नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, गटनेते प्रसाद सावंत,कार्यालय अधीक्षक रणजित कांबळे यांसह युनियन अध्यक्षांचे आभार मानले.

# देशी दारु विक्री करणाऱ्यास घेतले पोलिसांनी ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीररित्या देशी दारु जवळ बाळगून त्याची विक्री करणाऱ्या एका इसमास पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेवून त्याच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

तालुक्यातील नवकार लॉजिस्टीक लेबर कॅम्प कसळखंड या ठिकाणी एक इसम बेकायदेशीररित्या देशी दारुची विक्री करीत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गोडसे, पोलीस उपनिरीक्षक भरत पाटील, पोलीस हवालदार संतोष चिकणे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा मारुन कुंदन किशोर सिंग (३६) याला ताब्यात घेवून त्याच्याकडून संत्रा देशी दारुच्या बाटल्या व इतर ऐवज हस्तगत केला असून त्याच्यावर महाराष्ट्र प्रोव्हीविशन ॲक्ट कलम ६५ ई अंतर्गत कारवाई केली आहे.

गेल्या काही दिवसापासून पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या विशेष पथकामार्फत वेगवेगळ्या ठिकाणी अशा प्रकारे अवैधरित्या व्यवसाय करणाऱ्यांवर धडक कारवाई करण्यात येत असल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

# अनंत गीते यांच्या हस्ते भुमिपुजन झालेला भोगाव-कातळी रस्ता चौपदरीकरणात गायब

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ची तालुक्यातील कशेडी घाटाला पर्यायी मार्ग म्हणून भुयारी मार्गे दळणवळण केले जाणार असताना या कामादरम्यान माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या हस्ते भुमिपुजन झालेला भोगाव–कातळी रस्ता चौपदरीकरणात गायब झाल्याची बाब उघडकीस आली आहे. मात्र, आगामी काळात एकाच रस्त्यावर दोन वेगवेगळ्या विभागाचा निधी खर्च होणार असल्याने माजी केंद्रीय मंत्री गीते यांनी मंजूर केलेल्या रस्त्याच्या ठेकेदाराला आपोआपच क्लिनचिट मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था अलिबागच्या माध्यमातून भोगाव बुद्रुक, भो–गाव खुर्द ते कातळी असा सुमारे ४.५ कि.मी. अंतराचा रस्ता दुरूस्तीचे काम ०८ मार्च २०१३ रोजी तत्कालीन खासदार अनंत गीते यांच्याहस्ते भूमिपुजन होऊन सुरू झाले. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये त्याकाळी केवळ भारत सरकारचाच निधी उपलब्ध होत असल्याने संबंधित योजनेच्या कामाचा शुभारंभ करण्याचा अधिकार केवळ भारत सरकारचा प्रतिनिधी म्हणून खासदारांचा आहे. पुढील काळात योजनेच्या दुसऱ्या भागात केंद्रसरकारचे ७५ टक्के आणि राज्य सरकारचे २५ टक्के असा निधी उपलब्ध झाल्यानंतरच खासदारांसोबतच स्थानिक आमदार अथवा पालकमंत्री यांना शुभारंभ अथवा उदघाटन करण्याचा अधिकार काही अंशी प्राप्त होईल, असे त्यावेळीचे खासदार अनंत गीते यांनी भूमिपुजना–वेळी सांगितले होते.

या काळात धामणदिवी ते भोगाव खुर्द, भोगाव बुद्रुक व कातळी असा स्वतंत्र जिल्हा मार्ग रस्ते विकास आराखड्यामध्ये सन २००१ ते २०२१ च्या पुस्तिकेत नमूद करण्यात आला असल्याचे दिसून आले. या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आल्यानंतर गेल्या दोन वर्षांपासून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गाची रचना केली जात असताना भो–गाव खुर्द, भोगाव बुद्रुक व कातळी या रस्त्याचा काही भाग चौपदरीकरणामध्ये समाविष्ठ करण्यात आल्याने हा रस्ताच गायब झाला आहे. कशेडी घाटाच्या पर्यायी मार्गाचा बोगदा जिथे आहे, तिथे या रस्त्याचा अर्धाअधिक भाग असल्याने या रस्त्याची वाहतूक पुर्णपणे ग्रामीण जनतेच्या वापरासाठी बंद होऊन केवळ ठेकेदार कंपनीच्या वाहनांसाठी सुरू झाल्याने रस्ता नादुरूस्त होऊन गायब झाल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात स्थानिक ग्रामस्थांकडून उपलब्ध रस्त्यावरून वाहतूक सुरु असताना स्थानिक रेशनदुकानदार महिलेकडून रस्ता गायब होण्यासंदर्भात आवाज उठविण्यात आला आहे. याबाबत महामार्गाचे मुख्यप्रकल्प अधिकारी उदय पाटील यांनी चौपदरीकरणातील बोगद्यापर्यंतच्या रस्त्यात हा भोगाव खुर्द, भोगाव बुद्रुक ते कातळी रस्ता निकामी झालेला दिसून येत असला तरी पावसाळ्यापूर्वीच या रस्याचे डांबरीकरण पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही दिली आहे. भोगाव खुर्द, भोगाव बुद्रुक व कातळी या रस्त्याचे संबधित ठेकेदार शिंदे डेव्हलपर्स यांनी या रस्त्याचा काही भाग परस्पर मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणामध्ये समाविष्ट केल्यानंतर हा रस्ताच गायब झाल्याचे रेशनदुकानदार महिलेचे म्हणणे असून ठेकेदाराविरोधात कारवाई करण्याची गरज व्यक्त केली आहे.

महामार्ग चौपदरीकरण आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अशा दोन योजनांचा निधी एकाच रस्त्यावर खर्च होणार असल्याने याप्रकाराची दखल महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था अलिबागकडून कशाप्रकारे घेतली जाईल, याकडे परिसरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# तळा नगरपंचायतीने खरेदी केले तीन जनरेटर

## शहराला सुरळीत पाणी पुरवठा होण्यास होणार मदत

**दै.रायगड नगरी । तळा**

पाणी टंचाईच्या समस्येने ग्रासलेल्या तळा शहराला ऐन मे महिन्यात दिलासा मिळाला आहे.तळा नगरपंचायतीने १४ वित्त आयोगातील निधीतून ३६ लाखांचे तीन जनरेटर खरेदी केले आहेत ज्यामुळे तळा शहराला सुरळीत पाणी पुरवठा करण्यास मोठी मदत होणार आहे. हे तीन जनरेटर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या आंबेळी पंप हाऊस, धरण पंप हाऊस व प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर असलेली पाण्याची टाकी येथे बसविण्यात आले आहेत. त्याची ट्रायल पण घेण्यात आली आहे.




तळा शहराला आंबेळी लाईन व धरण लाईन येथून पाणीपुरवठा करण्यात येतो.मात्र पाणी पुरवठा सुरू असताना काहीवेळा विद्युत पुरवठा कमी दाबाने होत असल्या कारणाने सुरळीत पाणी पुरवठा होत नसत तसेच यामुळे पंप जळण्याचे प्रकार देखील घडले आहेत. ज्यामुळे तीन ते चार दिवस शहराचा पाणीपुरवठा खंडित राहतो. यावर उपाय म्हणून नगरपंचायतीने स्वतःचे जनरेटर खरेदी करावे अशी मागणी शिवसेना नगराध्यक्षा वनगरसेवक यांनी केली होती. त्या मागणीला यश आले असून तळा नगरपंचायतीने १४ वित्त आयोगाच्या निधीतून तब्बल ३६ लाखांचे तीन नवीन जनरेटर खरेदी केले आहेत. हे जनरेटर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या तिन्ही ठिकाणी बसविण्यात देखील आले असून या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर ऑटो स्टार्ट प्रमाणे १५ सेकंदामध्ये चालू होणार आहे. यामुळे तळा शहराला सुरळीत पाणीपुरवठा होण्यास मदत होणार असून दररोज किमान अर्धा तास शहराला नियमित पाणी पुरवठा होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे. गेल्या सहा महिन्यापासून मुख्याधिकारी माधुरी मडके, नगराध्यक्षा रेश्मा मुंढे, पाणी पुरवठा सभापती नेहा पांढरकामे, यांचे सह सर्वनगरसेवक, नगरसेविका व प्रशासनाने पाठपुरावा करून सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल तळे रहिवाशांनी धन्यवाद दिले आहेत.

# माथेरानच्या घोड्यांसाठी १ हजार ५०० किलो अश्वखाद्य पोहोचले

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील सध्याच्या लॉकडाऊनच्या काळात मुक्या प्राण्यांवरही रोजच्या खाण्याचे संकट ओढावले आहे. विशेषत: माथेरान सारख्या ठिकाणी लॉकडाऊनमुळे पर्यटन व्यवसाय थांबल्याने तेथील घोड्यांचा खाद्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या मुक्या प्राण्यांचे दु:खाची जाणीव ओळखून जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ.सुभाष म्हस्के व त्यांचे सहकारी काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मुक्या प्राण्यांची काळजी घेण्यासाठी पुढे सरसावले आहेत.

माथेरान या पर्यटनस्थळी जवळपास ४५० घोड्यांचा वाहतुकीसाठी वापर केला जातो. जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या पुढाकारातून या घोड्यांसाठी हायडॅक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने प्राथमिक स्वरुपात दि.०६ मे रोजी १ हजार ५०० किलो गोदरेज ग्रोवेट कंपनीचे पौष्टिक अश्वखाद्य वाटपासाठी पुरविले आहे. तसेच पशुसंवर्धन विभागातर्फे पुढील दोन ते तीन दिवसात २ हजार किलो अश्वखाद्य पुरविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील दानशूर व्यक्ती, जिल्हास्तरीय प्राणी क्लेश समिती सदस्य व प्राणी मित्र तसेच प्राणी कल्याणाकरिता सतत झटणाऱ्या व्यक्ती यांचीही या कामी मदत घेण्यात येत आहे. श्रीमती सीमा शांतीलाल पुनमिया यांनी पंख फाऊंडेशनच्या वतीने मुक्या प्राण्यांची भूक शमवण्यासाठी फूड बँकची स्थापना केली असून पशूपालकांनी शक्यतो आपली जनावरे मोकाट सोडू नये, असेही जिल्हा पशूसंवर्धन विभागाकडून पशूपालकांना सूचित करण्यात आले आहे. त्याचबरोबर पशूसंवर्धन विभागाकडून मुक्या प्राण्यांवरील उपचार व लसीकरणाची काळजी घेण्यात येत आहे.


लॉकडाऊनच्या काळात करोना विषाणूचा प्रसार होऊ नये, यासाठी मास्क वापरणे, सॅनिटायझरचा वापर करणे, हात वारंवार स्वच्छ धुणे, सोशल डिटन्सिंगचे पालन करणे तसेच ताप, सर्दी, खोकला,अंगदुखी असल्यास तात्काळ नजिकच्या शासकीय रुग्णालयामध्ये जाऊन वैद्यकीय सल्ला घेण्याबाबत पशूसवंर्धन विभागाकडून पशूपालकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील भटके कुत्रे, गाई, बैल व वासरे इत्यादी प्राण्यासाठी चारा पाण्याची व्यवस्था सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. याकरिता तालुकास्तरावर सहा.आयुक्त, पशुसंवर्धन (गट–अ), पंचायत समिती स्तरावरील पशुधन विकास अधिकारी (गट–अ/ब), सहा.पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक यांना कामाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, तसेच भविष्यातही मुक्या प्राण्यांची उपासमार होणार नाही, त्यांना योग्य ते उपचार मिळावेत यासाठी पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील राहील, अशी माहिती जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ.सुभाष म्हस्के यांनी दिली आहे.

# महिसदरा नदीवरील नवीन पुलाचे काम रखडले ; जुना पुलही वाहतुकीसाठी धोकादायक

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

मुंबई –गोवा या राष्ट्रीय महामार्ग १७ वरील पुई ग्रामपंचायत हद्दीतील महीसदरा नदीवरील नवीन पुलाचे काम यावर्षीही रखडले असून या नदीवरील जुना पूलही वाहातुकीसाठी धोकादायक झाला असुन या पुलाचे कठडे तुटले आहेत.यामुळे या महामार्गावरुन येजा करणाऱ्या प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.



मुंबई–गोवा महामार्गावरील फळस्पे ते इंदापूर दरम्यानच्या चौपदरी करणाचे काम गेली दहा ते बारा वर्षा पासुन सुरु असून या कामात कोणतेही प्रगती दिसत नाही तसेच या महामार्गावरील काही ठिकाणच्या पुलाचे काम पुर्ण झाले आहेत तर काही ठिकाणी तसेच रखडले आहे याचप्रमाणे महिसदरा नदीवरील नवीन पुलाचे काम गेल्या वर्षी भर पावसात जोरात सुरु केले होते ते पावसाला संपल्यावर पूर्ण होईल असेच वाटत असतांना दुसरा वर्षीचा पाऊस जवळ आला तरी या पुलाचे काम सुरु झालेले नाही. याविषयी ठेकेदाराशी संपर्क साधला असता त्यांनी केलेल्या कामाची शासनाकडून बिले न मिळाल्यामुळे काम थांबवले असल्याचे सांगितले आहे. तसेच या नदीवरील ५० ते ६० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला जुना पूल अतिशय धोकादायक बनला असुन या पुलाच्या दोन्ही बाजुचे कठडे तुटलेले आहेत यावरुन अवजड वाहन गेला तर हा पुल पूर्णपणे हादरला जात असल्याचे जाणवत आहे. त्यामुळे या पुलावरुन प्रवास करणे धोकादायक झाले आहे.

सद्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे वाहतुकीची प्रमाण कमी असले तरी मुंबई–गोवा मार्गावर असणारी अनेक पर्यटन स्थळे व औद्योगिक क्षेत्र यामुळे येथे नेहमी वाहनांची सतत वर्दळ सुरु असते त्यामुळे सतत मोठया प्रमाणावर वाहतुक कोंडी होत असते. यातुन घाईघाईने मार्ग काढताना तुटलेले कठडे लक्ष्यात न आल्यास मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही यामुळे प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला असुन अशा दुर्लक्षमुळे सावित्री नदी पुलासारख्या दुर्घटना घडतात व नंतर करोडो रुपये खर्च केले जातात. परंतु अनेकांना आपले प्राण गमावावे लागतात अशा घटना न घडण्याअगोदर उपाययोजना कराव्यात यासाठी लोकप्रतिनिधी, बांधकाम विभाग व संबंधीत व्यक्ती यांनी लक्ष देण्याची गरज आहे.असे प्रवाशी वर्गातुन बोलले जात आहे.

# मराठा आरक्षण रद्दचा माणगांवातील मराठ्यांनी केला जाहिर निषेध



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

मराठा आरक्षण रद्द करण्यास जबाबदार राज्य व केंद्र शासनाचा जाहिर निषेध करीत आमच्या हक्काचे मराठा आरक्षण मिळालेच पाहिजे, मराठा आरक्षण कोण म्हणत देणार नाही घेतल्या शिवाय राहणार नाही. मराठा आरक्षण सुप्रिम कोर्टाच्या वतिने रद्द करण्याचा जो दुर्दैवी निर्णय घेण्यात आला त्याचा सर्व समाजाच्या वतिने व दक्षिण रायगड सकल मराठा समाजाच्या वतिने जाहिर निषेध करण्यात आला. हा मराठा मोर्चा माणगांव एस टी स्टॅण्ड जवळील ट्रॅफिक पोलीस चौकी येथे निषेध करण्यासाठी जमला होता. यापुढे या निर्णयाचा निषेध करत हा लढा रस्त्यावर उतरुन आणखी तिव्र करण्यात येईल ! असा ईशारा मराठा समाजाच्या उपस्थित नेते मंडळींनी दिला आहे.

याठिकाणी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. हातात निषेध फलक, भगवे झेंडे घेऊन निर्णया विरोधात जोरदार घोषणाबाजी करुन संतप्त मराठा समाज्याच्या मावळ्यांनी सरकार व केंद्र सरकारला ईशारा दिला आहे. निर्माण परिस्थिती मुळे समाजातील सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या नाहीत, मराठा समाज दारिद्र्य रेषेखाली आला आहे. अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. आरक्षणा अभावी उच्च शिक्षणापासून वंचित नोकरीत प्रमोशन नाही, आजवर शांततेच्या व सामंजस्याच्या माध्यमातून आंदोलन करुन न्याय मिळेल अशी अपेक्षा बाळगलेला मराठा आता एक मराठा लाख मराठा अस न राहता संतप्त मराठा येणाऱ्या काळात कसलीही परवा न करता उग्र आंदोलनाच्या पावित्र्यात उभा ठाकला आहे.

# मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील आयजीपीएल कंपनीसमोरील गेट नं.३ जवळील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

शरद सोलंकर यांनी त्यांची १० हजार रुपये किंमतीची काळ्या रंगाची स्प्लेंडर प्लस मोटार सायकल क्र.एमएच–४५–एम–९०६८ ही आयजीपीएल कंपनीसमोरील गेट नं.३ जवळील मोकळ्या जागेत उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटार सायकल चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## NOTICE OF FIRST GENERAL BODY MEETING

To,
All Members,
Jindal Residency Co-Op. Hsg. Soc. Ltd,
Sir,

I am glad to inform you that our Society is registered on 06/04/2021 and the First General Body meeting of Jindal Residency Co-Op. Housing Society Ltd, S.No:745/1, Kasbe: Panvel, Dist Raigad, will be held on 24-05-2021 at 12:01 PM through VC/OAVM and the following subjects will be discussed.

### AGENDA

Subject No. 1: Election of a President for the meeting.
NO. 2: Admission of new members (other than the promoters) who have applied for membership of the Society.
NO. 3: Receiving and approving the statement of accounts as prepared by the chief promoter of the Society upto 14 days prior to the date of F.G.M. of the Society.
NO. 4: Constitution of provisional Committee until regular elections are held under byelaws of the Society.
NO.5: Fixing the limit upto which funds may be borrowed.
NO. 6: Authorizing the committee to secure conveyance of the right, title interest in the property in the name of the Society from the builder.
No. 7: Appoint internal auditor/accountant of the Society and fix his remuneration.
NO. 8: Authorize one of the members of the provisional Committee to call first meeting of the provisional Committee.
No. 9: Consider affiliation of the Society as member of the Housing federation of the District and other institutions mentioned in bye-laws No. 6.
NO. 10: Consider any other matter to be brought before the meeting with the permission of the Chair excepting those requiring proper notice.
Place: Panvel
Date: 05.05.2021

**Chief Promoter,**
**Mr Sagar Bhayade**
**Jindal Residency Co-Op. Hsg. Soc. Ltd.**

Please contact on 9987364954/7977101490 for VC/OAVM ID and Password or any other details.
If there will be no quorum for the meeting, the said meeting will be held after half an hour which may please be noted.